प्रति,
संपादक,
दैनिक हिन्दुस्थान,
कार्यालय,अमरावती.

विषय :- जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत.

महोदय,

वरील विषयानुसार खालीलप्रमाणे जाहिरात कमीत कमी जागेत दि.४.६.२०२१ च्या अंकात प्रसिध्द करण्यात यावी.

**सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत निविदा**

दि.१.७.२०२१ ते ३०.६.२०२२ या कालावधीकरीता ०६ सुरक्षा रक्षक दिवस व रात्र पाळीकरीता पुरविण्याबाबत प्राचार्य,श्री शिवाजी कृषि महाविद्यालय मोर्शी रोड,अमरावती यांचे नावे दि.२१.६.२०२१ पर्यंत निविदा सिलबंद व्दि लिफाफा पध्दतीनुसार मागविण्यात येत आहे. याबाबतची सविस्तर माहिती www.ssacpdkv.org या वेबसाईडवर उपलब्ध आहे.
(नियम व अटीची प्रत कार्यालयात उपलब्ध आहे.)

प्राचार्य,
श्री शिवाजी कृषि महाविद्यालय,
अमरावती.

प्रतिलिपी :-
१) लेखापाल,श्री शिवाजी कृषि महाविद्यालय,अमरावती.

## सुरक्षा रक्षक पुरवठादारांसाठी नियम व अटी

१) सिलबंद निविदा कार्यालयीन वेळेत दि.२१.६.२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच दि.२२.६.२०२१ ला दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येईल.

२) दोन लिफाफ्यापैकी एका लिफाफ्यात ठळकपणे तांत्रिक लिफाफा, असे नमुद करुन यामध्ये उत्पन्न कर प्रमणपत्र, जी.एस.टी.क्रमांक, नोंदणी क्रमांक व इतर आवश्यक माहितीबाबत प्रमाणपत्र व दुसऱ्या लिफाफ्यावर वाणिज्यीक लिफाफा ठळकपणे नमुद करुन त्यामध्ये प्रती सुरक्षा रक्षकानुसार मासिक किमान दर नमुद करावे.

३) निविदे सोबत अनामत रक्कम रु.१,०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) भरल्याशिवाय आपली निविदा उघडण्यात येणार नाही.

४) निविदेमधील अटी कमी जास्त करण्याचा किंवा कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अंतीम अधिकार मा.प्राचार्य, श्री शिवाजी कृषि महाविद्यालय, अमरावती यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

५) विहीत मुदतेनंतर आलेल्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही.

६) निविदा गहाळ झाल्यास अथवा पोष्टाव्दारे उशीर झाल्यास तसेच इतर कारणास्तव उशिर झाल्यास प्राचार्य जबाबदार राहणार नाही.

७) निविदा उघडल्यानंतर आवश्यक वाटल्यास निविदाधारकास वाटाघाटीकरीता बोलविण्यात येईल.

८) पुरविण्यात येणारे सुरक्षा रक्षक सुदृढ शरीरयष्टी व विशिष्ठ गणवेशात असावे. तसेच सुरक्षा रक्षकास गणवेश, टॉर्च, व्हीसल व इतर आवश्यक साहित्य पुरविण्याची जबाबदारी पुरवठाधारकांची राहील.

९) पुरविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांचा पी.पी.एफ. भरल्याबाबतच्या चालान किंवा पावतीची प्रत दर महिन्याला कार्यालयाला सादर करावी लागेल.

१०) निवड झालेल्या पुरवठादारांस सुरक्षा रक्षकाचे बिलाचे भुगतान मासिक धनादेशाव्दारे करण्यात येईल.

११) सुरक्षा रक्षकांचा पी.पी.एफ., जी.एस.टी., उत्पन्न कर व व्यवसाय कर भरण्याची संपूर्ण जबाबदारी ही पुरवठादाराची राहील.

१२) शासन नियमामध्ये वेळोवेळी झालेले बदल आपणास लागु राहतील.

१३) निवड झालेल्या पुरवठादाराने सुरक्षा रक्षक पुरविल्यानंतर त्यांच्या कार्यात काही अनियमितता आढळून आल्यास सुरक्षा सेवा पुर्वसूचित करुन रद्द करण्यात येईल.

प्राचार्य,<br>
श्री शिवाजी कृषि महाविद्यालय,<br>
अमरावत